CNR No. MHRG040033122025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १८/०९/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १५/१०/२०२५ |
| निकाल तारीख | : | ०७/०४/२०२६ |
| कालावधी | : | ०० व. ०६ म. २० दि. |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात, पनवेल, जिल्हा - रायगड**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४२२/२०२५**
**निशाणी क्र.१४/ब**

**१. नेनसी एडविन फर्नान्डीस**
वय- ५७ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. एडविन फर्नान्डीस, १, एड्डु चाळ,
तानाजी नगर, शिवसेना शाखेजवळ, सफेद पुल,
साकीनाका, मुंबई ४०००७२

**२. नेलसन कॉलीन एडविन फर्नान्डीस**
वय- ३५ वर्षे, धंदा- नोकरी,

**३. नॉवेल फर्नान्डीस**
वय- ३७ वर्षे, धंदा- नोकरी,

**४. फ्लॉरीन एडवीन फर्नानडेस**
वय- ३९ वर्षे, धंदा- नोकरी,
अर्जदार क्र.२ ते ४ रा. रूम नं.२६,
शेन ॲवेन्यु, सीब्रोक, मेलबर्न, व्हिक्टोरिया,
३०२८, ऑस्ट्रेलिया **... अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही **... सामनेवाले**

........................................................................................

अर्जदारांतर्फे विधिज्ञ – जयेंद्र आर. पावणेकर.

........................................................................................

**- <u>न्यायनिर्णय</u> -**
**(घोषित दिनांक ०७/०४/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील एडवीन मॉरीस फर्नान्डीस हे दिनांक १४/१२/२०२१ रोजी पॅरामाडंट जनरल हॉस्पीटल, मुंबई येथे मयत झाले. मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस यांची आई मेरी मॉरीस फर्नान्डीस यांचा मृत्यू दिनांक १६/०७/२००६ रोजी झालेला आहे. मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस व अर्जदार क्र.१ यांच्या संयुक्त मालकीची हीलाईन हाइट अपार्टमेंट, तेरावा मजला, रूम नं.१३०२, सेक्टर २०, प्लॉट नं.२८, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड ही मिळकत आहे.

३. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे साक्ष शपथपत्र निशाणी क्र.९ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये अर्जात सांगितलेल्या बाबी नमुद केल्या आहेत. अर्जदार यांनी अभिलेखावर यादी निशाणी क्र.४ अन्वये मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस यांचे मृत्यू प्रमाणपत्र, विक्री करारनाम्याची प्रत, अर्जदार क्र.१ च्या आधारकार्डची व पॅनकार्डची प्रत, अर्जदार क्र.२ व ३ च्या पासपोर्टची व वाहन चालविण्याच्या परवान्याची प्रत, कुलमुखत्यारपत्राची प्रत व मेरी मॉरीस फर्नान्डीस यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.११/क अन्वये पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत 'दैनिक किल्ले रायगड' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिनांक २०/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. न्यायालयीन बेलीफ मार्फत केलेला जाहीरनामा व त्याचा अहवाल, दवंडीपावती निशाणी क्र.७ वर आहे. प्रस्तुत अर्जाला दिलेल्या मुदतीत ते आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस यांचे कायदेशीर वारस आहेत.

६. वरील परिस्थिती पाहता असे म्हणावे लागेल की, या प्रकरणामध्ये अर्जदार हे मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. करीता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्जदार क्र.१ नेनसी एडविन फर्नान्डीस, अर्जदार क्र.२ नेलसन कॉलीन एडवीन फर्नान्डीस, अर्जदार क्र.३ नॉवेल फर्नान्डीस व अर्जदार क्र.४ फ्लॉरीन एडवीन फर्नानडेस हे मयत एडवीन मॉरीस फर्नान्डीस यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. अर्जदार क्र.१ नेनसी एडविन फर्नान्डीस, अर्जदार क्र.२ नेलसन कॉलीन एडवीन फर्नान्डीस, अर्जदार क्र.३ नॉवेल फर्नान्डीस व अर्जदार क्र.४ फ्लॉरीन एडवीन फर्नानडेस यांना वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार स्टॅम्प डयुटी आकारून निर्गमीत करण्यात यावे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.04.07 17:39:48 +0530

पनवेल
दिनांक : ०७/०४/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.